# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.महिला व बाल कल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक-१
## सभावृत्तांत

दिनांक - ०६.०७.२०१०	वेळ- सकाळी ११.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बाल कल्याण समितीची पहिली सभा (विशेष सभा) मंगळवार दिनांक ०६.०७.२०१० रोजी सकाळी ११.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस मा.आर.के.गायकवाड- अप्पर जिल्हाधिकारी, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.सौ.वाघेरे उषा संजोग
२. मा.कदम निर्मला सदगुरू
३. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
४. मा.ढोरे उषा उर्फ माई मनोहर
५. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
६. मा.लोखंडे सुजाता सुनिल

याशिवाय मा.देशमुख- सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.अप्पर जिल्हाधिकारी- (पिठासीन अधिकारी)** मी आर.के.गायकवाड अप्पर जिल्हाधिकारी पुणे याठिकाणी सर्वांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत महिला व बाल कल्याण समितीच्या सभापतींची नेमणुक करणेचा विषय आहे त्यासाठी मा.विभागीय आयुक्त पुणे यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणुन माझी याठिकाणी नेमणुक केलेली आहे. मुक्त व निर्भयपणे महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आलेली आहे.

**मा.नगरसचिव-** विषय क्रमांक १-मा.महिला व बाल कल्याण समितीच्या सभापतींची नेमणुक करणे.

मा.महिला व बाल कल्याण समितीचे सभापती पदावर नेमणुक करणेकामी दोन नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

---------------------------------------------------------------

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | कदम निर्मला सदगुरू | सौ.गुंजेकर स्मिता रमेश | सौ.वाघेरे उषा संजोग |
| २) | कदम निर्मला सदगुरू | सौ.गावडे सुषमा गोविंद | सौ.मंगलाताई अशोक कदम |

[ मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेली उपरोक्त दोन नामनिर्देशनपत्रे मा.पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. मा. पिठासीन अधिकारी यांनी त्याची छाननी केली. ]

**मा.अप्पर जिल्हाधिकारी- (पिठासीन अधिकारी)** मा.महिला व बाल कल्याण समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त दोन नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असुन ती नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा. महिला व बालकल्याण समिती सभापती पदाची निवडणुक लढविणारे मा.कदम निर्मला सदगुरु हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १

दिनांक-०६.०७.२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समिती सभापती पदासाठी दोन नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली असुन वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा.महिला व बाल कल्याण समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.कदम निर्मला सदगुरू हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा.कदम निर्मला सदगुरू यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-

**( आर.के.गायकवाड )**

अप्पर जिल्हाधिकारी- पुणे

पिठासिन अधिकारी

महिला व बाल कल्याण समिती (विशेषसभा)

---------

(नवनिर्वाचित सभापती मा.कदम निर्मला सदगुरू यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा.नगरसचिव** - विषय क्रमांक २ मा.महिला व बाल कल्याण समितीच्या उपसभापतींची नेमणुक करणे.

मा.महिला व बाल कल्याण समिती चे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले नाही.

ठराव क्रमांक -२ विषय क्रमांक - २

दिनांक- ०६/०७/२०१०

सूचक- मा.उषा ढोरे अनुमोदक- मा.उषा वाघेरे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीच्या, उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा.महिला व बाल कल्याण समिती च्या उपसभापतीची नेमणुक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- ३ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- ०६.०७.२०१०

सूचक :- मा.उषा वाघेरे अनुमोदक :-मा.उषा ढोरे

मा.महिला व बाल कल्याण समिती ची सभा प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी, दुपारी २.०० वाजता विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्ट्या असलेस त्या सुट्टी/सुट्ट्यानंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी २.०० वाजता सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्यावेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(कदम निर्मला सदगुरू)
सभापती
महिला व बाल कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/९७० /१०
दिनांक- ०६/०७/२०१० चे लगत

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.